# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र.१०/२०२४** **दिनांक ०९/०९/२०२४**
**स्थळ-जिल्हा न्यायालय, अहमदनगर** **वेळ- दुपारी ३.०० वा.**

मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथील जनहित याचिका नं.९८/२०२१ व (सिव्हील ॲप्लीकेशन नं.११९७३/२०२१) यावर दि.१३/०९/२०२२ रोजी मा.न्यायालयाने दिलेल्या आदेशान्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी करिता नियुक्त केलेल्या तदर्थ (Ad-hoc) समितीची विशेष सभा **सोमवार दि.०९.०९.२०२४ रोजी दुपारी ३.०० वा. मिनी कॉन्फरन्स हॉल, जिल्हा न्यायालय, अहमदनगर** येथे आयोजित करणेत आली होती.

त्यानुसार तदर्थ (Ad-hoc) समितीची सभा **सोमवार दि.०९.०९.२०२४ रोजी दुपारी ३.०० वा. मिनी कॉन्फरन्स हॉल, जिल्हा न्यायालय, अहमदनगर** येथे मा.श्री.सुधाकर यार्लगड्डा, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

**या सभेस खालील मा.सदस्य उपस्थित होते.**

**मा.श्री.सुधाकर यार्लगड्डा,**
**प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर तथा**
**अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

**मा.श्री. सिध्दाराम सालीमठ, भा.प्र.से.**
**जिल्हाधिकारी, अहमदनगर तथा**
**सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

**मा.श्री. गोरक्ष गाडीलकर, भा.प्र.से.**
**मुख्य कार्यकारी अधिकारी तथा**
**सदस्य सचिव, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

---

विषय नं.१ मा.उच्च न्यायालयाचे दि.०९.११.२०२३ व दि.०९.०५.२०२४ रोजीचे निर्णयानुसार दि.३१ ऑक्टोबर, २०२३ ही कट ऑप दिनांक निश्चित करुन सलग १० वर्ष सेवा झालेल्या कंत्राटी कामगारांना संस्थान सेवेत सामावून घेणेबाबत.

निर्णय क्र.५४८ प्रस्तावावर सविस्तर चर्चा केली, शासनाकडे पाठविलेला प्रस्ताव व शासनाने दि.०५/०९/२०२४ रोजी दिलेली मान्यता विचारात घेऊन त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी. खालील सुधारणा व दुरुस्तीसह प्रस्ताव मंजुर.

प्रस्तावातील परिच्छेद १ व ३ चे बाबतीत

परिच्छेद क्र.१ - गट क मध्ये पात्रते अभावी ज्या कर्मचा-यांचे समायोजन करता येत नाही व गट ड ची सुध्दा तत्कालीन शैक्षणिक अर्हता ज्यांच्याकडे नाही अशा कर्मचा-यांना, समायोजित करता येणार नाही.

परिच्छेद क्र.३ मधील शैक्षणिक अर्हतेबाबत- शैक्षणिक अर्हतेची अट तत्कालीन शासन निर्णयाप्रमाणे शिथील करण्यास मान्यता देण्यात आली.

परिच्छेद क्र.४– समायोजनासाठी प्रस्तावीत कर्मचा-याकडे तत्कालीन विहित अर्हता नसेल तर अशा कर्मचा-याचे समायोजन करता येणार नाही. ही एकवेळ समायोजनाची प्रक्रिया असल्यामुळे पदाअभावी ज्यांचे समायोजन होऊ शकत नाही. त्यांना प्रतिक्षा यादीवर ठेवण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. तथापी शासनाकडे पाठविलेला प्रस्ताव त्यास शासनाने दिलेल्या मान्यतेनुसार कार्यवाही करावी.

परिच्छेद ११ नंतरचा परिच्छेद अ खालील प्रमाणे वाचण्यात यावा.

संस्थान अधिनियम–२००४ अमंलात येण्यापुर्वी संस्थानमध्ये ठेकेदारामार्फत कार्यरत कंत्राटी कर्मचा-यांपैकी गट ‘क’ साठी पात्र ५९ व गट ‘ड’ साठी पात्र ३७९ कर्मचा-यांपैकी ३६५ असे एकूण ४२४ कर्मचा-यांना संस्थानचे मंजुर आकृतीबंधातील गट ‘क’ व ‘ड’ चे सरळसेवेच्या पदावर स्थायी कर्मचारी म्हणून नेमणूक देता येईल. मात्र मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पदांची संख्या, सेवाजेष्ठता व शैक्षणिक अर्हता या सर्वांची पडताळणी करुन, खातरजमा करुन घेऊन योग्य ती कार्यवाही करण्यास शासनाच्या दि.०५/०९/२०२४ रोजीचे पत्रानुसार मान्यता देण्यात आली.

प्रस्तावातील परिच्छेद ११ (क) नामंजुर करण्यात येत आहे.

प्रस्तावातील शेवटचा परिच्छेद व आजचा प्रस्ताव क्र. २ - सेवाप्रवेश नियमास शासनाची मान्यता मिळणेचे अधिन राहून स्थायी गट-‘ड’ पदावरील कर्मचा-यांना लगतचे वरिष्ठ पदावर तदर्थ पदोन्नती देणेबाबत, च्या अनुषंगाने श्री साईबाबा संस्थान कर्मचारी वेल फेअर संघटना, शिर्डी यांनी केलेल्या मागणीच्या संदर्भात सविस्तर चर्चा केली. प्रस्ताव क्र.२ मधील निर्णयाप्रमाणे कार्यवाही करावी. त्यांना उपरोक्त समायोजनामुळे समायोजीत

**झालेल्या कर्मचा-यांचे आगोदरचा मानीव दिनांक सेवाजेष्ठतेसाठी देण्यात यावा, व ही बाब उपरोक्त समायोजीत कर्मचा-यांच्या आदेशामध्ये नमुद करणेत यावी.**

**उपरोक्त सुधारणासह प्रस्ताव मंजुर.**

**मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार तदर्थ समितीने एकवेळ समायोजन प्रक्रिया राबविण्यासाठी पाठविलेल्या प्रस्तावास शासनाने दि.०५.०९.२०२४ चे पत्रान्वये दिलेल्या मान्यतेनुसार कार्यवाही करावी. याबाबतचा पुर्तता अहवाल मा.उच्च न्यायालय व शासनाकडे पाठविण्यात यावा. (कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.२ सेवाप्रवेश नियमास शासनाची मान्यता मिळणेचे अधिन राहून स्थायी गट-'ड' पदावरील कर्मचा-यांना लगतचे वरिष्ठ पदावर तदर्थ पदोन्नती देणेबाबत.**

**निर्णय क्र.५४९ सेवाप्रवेश नियमास शासनाची मान्यता मिळणेचे अधिन राहून स्थायी गट-'ड' पदावरील कर्मचा-यांना लगतचे वरिष्ठ पदावर तदर्थ पदोन्नती देणेबाबत, च्या अनुषंगाने श्री साईबाबा संस्थान कर्मचारी वेल फेअर संघटना, शिर्डी यांनी केलेल्या मागणीच्या संदर्भात सविस्तर चर्चा केली. त्यांची मागणी वाजवी आहे, त्यामुळे असा निर्णय घेतला की, सेवाप्रवेश नियम/ विनियम मान्यतेचा अधिन राहून या संघटनेच्या निवेदनाच्या अनुषंगाने पात्र कर्मचा-यांना तदर्थ पदोन्नती देण्याची प्रक्रिया राबविण्यात यावी. त्यांना उपरोक्त समायोजनामुळे समायोजीत झालेल्या कर्मचा-यांचे आगोदरच्या मानीव दिनांकाची सेवाजेष्ठता देण्यात यावी.**

**गट 'क' साठी पदोन्नतीने नेमणुकीस पात्र असलेल्या ज्या कर्मचा-यांना पदोन्नतीच्या कोटयामधील पदाअभावी पदोन्नती मिळत नसेल त्यांना सरळ सेवा पदावर तदर्थ पदोन्नतीने नियुक्ती देण्यात यावी.**

**सदरहु प्रस्ताव शासनाकडे पाठवुन शासनाची मान्यता घेण्यात यावी.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.३ पुजारी व सहाय्यक पुजारी पदे जाहिरातीव्दारे भरणेबाबत.**

**निर्णय क्र.५५० प्रस्ताव मंजुर. (कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.४ पुजारी व सहाय्यक पुजारी कंत्राटी पदाबाबत.**

**निर्णय क्र.५५१ प्रस्ताव मंजुर. (कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

**विषय नं.५ श्री साईबाबा संस्थानमार्फत उभारण्यात आलेल्या श्री साईबाबा शैक्षणिक संकुल.**

**निर्णय क्र.५५२ प्रस्ताव मंजुर. (कार्यवाही-बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.६ संस्थान आस्थापनेवरील स्थायी कर्मचा-यांचे सेवाजेष्ठता बाबत.**

**निर्णय क्र.५५३ प्रस्ताव मंजुर. (कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.७ 'साईटेक प्रकल्प-२' अंतर्गत डेटा सेंटर येथे M/s Cybernet IT Pvt. Ltd., Pune यांचेमार्फत कार्यान्वीत Blade Servers/chessis, San switches, San Storage, Server Rak & Software चे Comprehensive Annual Maintenance Contract (CAMC) बाबत.**

**निर्णय क्र.५५४ विहित पध्दतीने जाहीर ई-निविदा प्रक्रिया राबविणेत यावी.**
**(कार्यवाही-माहिती तंत्रज्ञान विभाग)**

---

**वरील निर्णय क्र.५४८ ते ५५४ सर्वानुमते घेण्यात आले.**
**यानंतर सायं.०७ .१५ वा. सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.**

स्वाक्षरीत/-
**(गोरक्ष गाडीलकर, भा.प्र.से.)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी तथा**
**सदस्य सचिव, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

स्वाक्षरीत/-
**(सिध्दाराम सालीमठ, भा.प्र.से.)**
**जिल्हाधिकारी, अहमदनगर तथा**
**सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

स्वाक्षरीत/-
**(सुधाकर यार्लगड्डा)**
**प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर तथा**
**अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**